# रत्नांच्या जाहल्या खापरखुंटी

विडंबन कवितासंग्रह

- निकिता राजेश पाटील



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# रत्नांच्या जाहल्या खापरखुंटी

लेखिका : निकिता राजेश पाटील

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# रत्नांच्या जाहल्या खापरखुंटी

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना दाद द्या

ई साहित्य ला आपल्या मित्रांचे मेल पत्ते द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# रत्नांच्या जाहल्या खापरखुंटी

## निकिता राजेश पाटील

पत्ता : १०९, वांगणी हाईटस्, बदलापूर नेरळ हायवे, पूनम हॉटेलजवळ, वास्तुकार नगर, वांगणी (पूर्व), जि. ठाणे. 421503

फो. न. : ८६८९९५४८०६

e-mail shaktileelanikita@gmail.com

**या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.**

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :
www. esahity.com
www. esahity.in
esahity@gmail.com
eternity, G1102,
eleventh floor,
eastern express highway,
Thane. 400604

प्रकाशन : ४ जुलै २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

*रत्नांच्या जाहल्या खापरखुंटी*

*विडंबन कवितासंग्रह*

-निकिता राजेश पाटील

## ओळख



मी नवोदित लेखक नसून मी “चंद्रिका” “अस्मिता” “विद्याविकास” अशा मासिकांतून लेख,कथा-कविता श्लोक लिहिल्या आहेत. डोंबिवलीच्या नाट्यमंचावर स्वरचित एकपात्री नाटक ‘द्रौपदीचे स्वगत’ हे नाटक सादर केले.याशिवाय मला संस्कृत भाषेतील श्लोक लेखनासाठी शाळेतर्फे ‘अमृतकन्या गौरव’ पुरस्कार मिळाला आहे. याखेरीज काही दिवसांपूर्वी मी मानवविद्या विभागात ‘वाचनसंस्कृती’ या विषयावर संशोधन केले आहे. मी सध्या बी.ए.मराठी साहित्य या शाखेत शिक्षण घेत आहे.

**वाङ्मयीन परिचय:-**

१) संस्कृत चंद्रिका अशा मासिकात श्लोक लेखन.

२)विद्याविकास संस्थेच्या वार्षिकात( सांवत्सरिकात) रौप्य महोत्सवा-निमित्त “द्रौपदीचे आत्मकथन” हा ललित लेख व “मनाचे प्रदूषण” ही कविता व “बायको नावाचं अजब रसायन” ही विनोदी कथा प्रकाशित.

३) टिळकनगर सांस्कृतिक महोत्सवानिमित्त “द्रौपदीचे स्वगत” ह्या एकपात्री प्रयोगाचे वेशभूषा-प्रयोगलेखन-फार्सलेखन व सादरीकरणाचा एकत्रित मेळ.

४) बदलापूरच्या कविसंमेलनात कविरुपात काव्यवाचन.

५) अस्मिता या हस्तलिखित सांवत्सरिकात “नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर” या लेखाचे लेखन.

६)मानवविद्या विभागात “वाचनसंस्कृती : डिजिटल आणि इलेक्ट्रॉनिक ग्रंथालयाचे महत्त्व” या विषयावर संशोधन.

७) निबंध स्पर्धांमध्ये प्रथम क्रमांक.

वाचन:- मी आजपर्यंत विविध प्रकारची पुस्तके वाचली आहेत.त्यातील सगळ्यात जास्त महाभारताची पुस्तकं आहेत.

निकिता राजेश पाटील

👸 👰 👸

## *अर्पणपत्रिका*

**ज्या जननीमाईंनी मला हा विडंबनात्मक काव्यसंग्रह लिहिण्याकरिता प्रेरणा दिली व वेळोवेळी मार्गदर्शन केले,त्या जननीमाईंना माझा हा विडंबनात्मक काव्यसंग्रह 'रत्नांच्या जाहल्या खापरखुंटी" सौहार्दाने अर्पण.**

**आपली शिष्या व दुहिता**

**कुमारी शक्तिलीला**

**१/१/२०२०**

*अपि स्वर्णमयी लङ्का न मे लक्ष्मण रोचते !*

*जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी ||*

*(रामकाण्ड,बिभीषणहस्ते लङ्काप्रदानम् अध्याय)*

## *मनोदय*

मी स्वरचित कविता लिहिल्या आहेत. परंतु विडंबन कविता करण्याचा विचारही मनात आला नव्हता.कारण माझ्या वाचनात विडंबन कविता आल्याच नव्हत्या. मला मोठ्या प्रमाणात निसर्गकविता, गंभीर आशयाच्या कविता, स्त्रीप्रधान कविता मातृसमर्पित कविता, देशभक्तीपर कविताच उपलब्ध झाल्या.

अकरावीच्या पुस्तकात मला प्र.के. अत्रे यांची विडंबन कविता “चाफा” मी वाचली. त्यामुळे माझ्या मनात विडंबन कविता करण्याचा विचार तरळला.

तेव्हा आईने मला प्रेरणा दिली.

परंतु विडंबनाकरिता माझ्याकडे कविता उपलब्ध नव्हत्या.

म्हणून मी माझ्या शालेय पाठ्यपुस्तकातील, लायब्ररीतील काव्यसंग्रहातील कविता वाचल्या व त्यावर विडंबन करायचे ठरवले.

शेवटी मी १ जानेवारी २०२० ला विडंबन कवितासंग्रह लिहायला सुरुवात केली.

## अनुक्रमणिका


१) रत्नांच्या जाहल्या खापरखुंटी- स्वरचित कविता

२) थांब

३) जानीमानी

४) या लग्नात मिटे न विग्रहभाषा

५) अध: पतित शहराविषयी

६) विचार तरूणाईचे

७) नाल्यागटाराकाठी

८) माणसा,'अ' समर्थ तू!

९) बेभान

१०) आता, अगदी जस्ट

११) "सौ" नाम

१२) तुझे हात, कुणाचे? की भुताचे?

१३) एक विलक्षण नूर

१४) कात्रींनी

१५) वाट लागते वेलदोड्याच्या दाण्याची

१६) सवितेचं रौद्ररूप

१७) ' स्पेशल' वधस्तंभाकडे

१८) भात
१९) दाभण
२०) लोकलच्या डब्यात भिडलेली अनामिका
२१) मख्ख
२२) कचऱ्याच्या रांगेत चाललीस भल्या दुपारी
२३) मूठ ही आवळली
२४) रापी १
२५) रापी २
२६) माती
२७) जफर आणि मी
२८) आंघोळी
२९) विचारावा अर्थ
३०) माझी पाच-सहा वर्षांची पोरगी
३१) मळमळ
३२) जोकगीत
३३) करवतीची पात
३४) बायका खोळंबून आहेत बसस्टॉपवर

## रत्नांच्या जाहल्या खापरखुंटी

*ही कविता प्रथम कविता असून ही माझी स्वरचित कविता आहे.*



ऐका हो ऐका वेगळ्या आगळ्या गोष्टी,

तुटली कशी उडणाऱ्या म्हातारीची झाडू यांची करूया खरीखोटी.

‘ अकडम् डमडम् ‘ करत फिरणारी गायब कशी झाली जादुई काठी,

सूत तुटले जिचे अशी कशी वस्त्रे विणणारी यक्षांची ती धोटी ? दगडे
देते आता पूर्वी सोन्याची नाणी देणारी अशी कशी ती पेटी?

निरनिराळ्या अद्भुत गोष्टींची जाहली मनी दाटावाटी,

 ऐकली का कधी गोष्ट ही,

‘ रत्नांच्या जाहल्या खापरखुंटी ?’

‘परीसाने केले लोखंडाचे सोने’

हे ऐकलेच असेल, मात्र रत्न्यांच्या जाहल्या कैश्या खापरखुंटी हे कोण जाणे!

डोळे झाकुनीही सापडते समुद्राच्या लाटांत सागरगोटी, सांगेल का कुणी मज, रत्नांच्या जाहल्या कैश्या खापरखुंटी ?

हाकारितां पवनही घाले मिठी, सांगेल का कुणी मज, रत्नांच्या जाहल्या कैश्या खापरखुंटी ?

कोडी सोडवितां सोडवितां मती होईल कुंठित,वेळ वाटेल छोटी, सांगेल का कुणी मज, रत्नांच्या जाहल्या कैश्या खापरखुंटी ?

उत्तर- स्पष्टीकरण कुणीतरी द्यावे या समस्यापूर्तीसाठी,

सांगेल का मज, रत्नांच्या जाहल्या कैश्या खापरखुंटी?

## थांब

*('खांब' या कवितेचे विडंबन)*




बाईच्या हाताआड दडलेले असते लाटणे !

वर वर गडगडाटी हसणे आणि आतल्या आत पेटणे ॥

आल्यागेल्यांचा पत्कार बाई स्वतः घेत नसते |

घरभर दिवसाउजेडी सर्वांना तारे दाखवत सतत फिरत असते !!

नवरा मुले सासू सासरे तिलाच साद देतात |

" घे हे बये " म्हणून आपला पगार विनामोबदला तिच्याच हाती सोपवतात ||

माहेरच्यांची मैत्रिणींची चौकशी करत ती टॉर्च होऊन जागते ।

भल्या रणरणत्या दुपारी उठून बाई नाष्ट्याच्या कामाला लागते॥

“सांधा ,दाढा, डोकेदुखीचा वेढा’ अशी नेहमीची कुरबुर व

दवाखान्याकडे धाव क्षणोक्षण !

औषधाच्या गोळ्या तिला मिळाल्या असतील लग्नात आंदण !!

कपाळावर खुलत असते बारीकशी टिकली वा काळा टिळा !

मणी मंगळसूत्र पडले पेटाऱ्यात, छोट्याशा साखळीने साजरा दिसतो

गळा ||

तिच्या ब्रेसलेटआड मनगट असते फुगलेले तट्ट |

“सारे मीच खाईन।“तिचा जन्मताच हट्ट !!

“कुशीत भार वाहणार नाही” हा आग्रह नवा !

‘म्हणे मी व माझं काम’ इतकाच जाणते दुवा !!

घरात पाय रुतवून बाईच अधिराज्य चालवते ।

“आतातरी थांब” असे कोणीही म्हणतांही आपलेच म्हणणे खरे करून

दाखवते ||

*या विडंबन कवितेत स्त्रीच्या परिवर्तनाचे वर्णन केले आहे.*

## जानीमानी

*(' आणीबाणी ' या कवितेचे विडंबन )*




अशा काही रात्री गेल्या ज्यात काळवंडलो असतो,

कारण विद्युत पुरवठा करणारा भारनियमनाचा जाच चालवत असतो !!

वादळ असे भरून आले तारू थडकणार होते |

कारण तकलादू जहाजात इतर खलाशांसह मलाही कोंबले होते||

हरपून जावे भलतीकडे इतके उरले नव्हते भान |

लाखोंची लॉटरी लागली असे पडले होते सपान ||

डाव असे पडत होते की खेळ सारा उधळून द्यावा |

कारण समोरचा पठ्ठा असा खेळ खेळत होता की प्रतिस्पर्धी हरून जावा||

कसे निभावून गेलो कळत नाही कळले नव्हते!

वादळावेळी जहाज समुद्रात निघण्यापूर्वी मी उतरलो होतो नि

काळवंडलेल्या रात्री इन्वेटर वापरले होते !!

तसे जवळ काहीच नव्हते,

तसे जवळ काहीच नव्हते,

नुसते दोन हात ‘जगन्नाथ’ होते!

💪 💪 💪

*या विडंबन कवितेत मनुष्याकडे काहीच नसले ,तरी तो अशक्य ते शक्य करू शकतो, याची जाणीव करून दिली आहे.*

## *या लग्नात मिटे न विग्रहभाषा*

*( ‘ या जन्माला फुटे न भाषा’ या कवितेचे विडंबन)*



असे तुझ्याशी बोलावे हे,

ठरवुन आलो मनात काही | आणिक तुझ्या नेत्रीं दिसले काहीच नाही , काहीच नाही ॥

असा कसा मग मुकाच झालो! चर्चा केली नको नको ती ।

तू म्हणालीस जे काय बोलायचे ते बोल लवकर नाहीतर डोक्यावर घालेन माती ।।

एक आवंढा गिळून तूही,
भयें गिळले पुढील जे थरथरले ओठी ||
कारण मी क्रुद्ध होवूनी तुज मारावया उचलिली काठी ।।

त्या काठीच्या रेघेवर पण,
सही ठोकिली मम नशिबाने |
तु म्हणालीस, काठी जर उगारलीस तू मजवरी तर मी लग्न न करेन तुझ्यासह याकारणे।।
या लग्नात फुटे न विग्रहभाषा,
निदान दुसऱ्या दिवशी फुटेल का ती?
तुझ्यासह भांडल्यावाचुन
लग्न न मोडले जाती ||

😠 💔 💔

*या विडंबन कवितेत युवा पिढीची लग्न व संसाराप्रति पराङ्मुखता दाखवली आहे.*

# अध:पतित शहराविषयी

*('नव्या शहराविषयी' या कवितेचे विडंबन)*



स्वप्नात तूच जल्लाद होऊन धावताहे

असं दृश्य असलं की तुला धावताच येत नाही

माझाही असाच अनुभव

मी कुणावर प्राणघातक शस्त्राने हल्ला

करताहे

असं स्वप्न असलं की मला

हल्ला करताच येत नाही
तसा प्रयत्न केला तर जागच येते.

स्वप्नांचेही संदर्भ कसे रेंगाळतात आपल्याजवळ,
तू व्हॉट्सअ‍ॅपवर बसलीस की तुला स्टेटस टाकताच येत नाही,
तसेच माझेही
पुष्कळ लाइकस द्यायचे ठरविले की, देताच येत नाही

आता या विशाल व्हॉट्सअ‍ॅपच्या मर्यादा,
तुझ्या प्रमाणेच मलाही भासू लागल्याहेत छोट्या
चल ,
आपण आपले छोटे नवे चॅटग्रुप वसवू ,
ज्याचे अ‍ॅडमीन आपणच असू.

*या विडंबन कवितेत नैतिकदृष्ट्या अध:पतन झालेल्या व आभासी जगात रमलेल्या समाजाचे वर्णन केले आहे.*

## *विचार तरूणाईचे*

*('विचार' या कवितेचे विडंबन)*





कधी विचार असे येतात,

जसे रात्रभर मोबाईलवर जागून तरुण झोपी जावेत दुपारपर्यंत,

डिशनऱ्या पालथ्या घालून शोधलेले शब्द ,

जेव्हा मेंदूच्या मेमरीकार्डमधून डिलीट होतात,

अशावेळी ते शब्द लिहून बेंचखालून सरकणारे तुझे,

हात मला हवेत.

कधी विचार असे वागतात,

तंबाखू रवंथ करत तरुण तरुणींसोबत संथ फिरतात,

रात्री – मध्यरात्री टेबललॅम्पच्या उजेडात,

आपले स्टेटस किती योग्य आहे यावर तरूण भांडत बसतात, अशा वेळी तुझे मला लाईक देणारे हात हवेत.

कधी विचार असे होतात,

दांडी तोलीत, पंख आवरून पिंजऱ्यात कबुतरे बसतात,

भारनियमनाच्या धुवांधार खोल काळोखात,

पट्टेवाले (टॅटूवाले हात ) ! टॉर्च घेऊन मोबाईल शोधतात,

अशा वेळी पटकन कॉल करणारे तुझे मला हात हवेत.

🧑‍🤝‍🧑 👭 👬

*या विडंबन कवितेत युवा पिढीची मानसिकता दाखवली आहे.*

## *नाल्यागटाराकाठी*

### *('तळ्याकाठी' या विडंबन कवितेचे विडंबन)*





अशा एखाद्या नाल्यागटाराच्या काठी बसून राहावे, मला वाटते |
जिथे अस्वच्छता स्वतःच निवारा शोधित थकून आली असते ॥

जळातला हिरवा गाळ रंगीत पाण्याशी मिळून असतो काही | वाहत
जाताना बाटल्या, पत्र्याचे डबे मुळीच सरसर करत नाही ||

काळया जळास भरवीत कापरे, जळवलये उठवून देत |
उगीच सरकत हळूच थिरकत, पिशवी मधूनच वर नसते येत ॥
बुडबुडे उडवत हळुवार पोहत प्लॅस्टिकच्या बदकांचा थवा
नाल्यागटारीच्या जळात विसावा घेत असतो।
दूर कोपयात कचरा खाणारा बगळा ध्यानभंग होऊ देत नसतो||
हृदयावर कुविचारांची धूळ जिथे वळत जाते,
अशा एका नाल्यागटाराच्या काठी बसून राहावे, मला वाटते.

या विडंबन कवितेत जलप्रदूषणाचे वास्तव चित्रण केले आहे.

## माणसा, 'अ'समर्थ तू !

### ('माणसा, समर्थ तू" या कवितेचे विडंबन)



माती सर्व संपदा,मस्तकात भारदा,

असे असून सामर्थ्यवानसा, झुरसी काय व्यर्थ तू,

माणसा असमर्थ तू ॥ धृ ॥

वळविशील तू गाद्या,नमविशील तू नांगरा,

अडविशील तू नगारा, जिंकशील तू डोंबरा,

अदम्य अशक्ति ही, विसरसी किमर्थ तू ||१||

अनिष्ठ होऊनी, रहा करीत आळस तू,

उगवतील दगडे, गाळताच कोळस तू,

हातपाय चालवूनी, निमंत्रिशी अनर्थ तू ||2||

भाळी ताठ हात लाविशी, विसरुनी स्वभाव तू,

कार्य जे उभे पुढे, तयास पाठ फिरव तू,

पंगु नव्हे देव, त्यासवे मांडू नकोस शर्थ तू ||३||

बस, आवळ पाऊले, खालती कर उभय हात तू, भ्यावयास हवास जन्मसी, काहीच नाही रे जगात तू,

हृदयी पार्थ बोलतो, रणांगणात रणछोड़ कृष्ण तू, माणसा असमर्थ तू ||4||

*या विडंबन कवितेत कोणत्याही व्यक्तिने नवं कार्य हाती घेताच त्याला प्रेरित करण्याऐवजी त्याला खाली खेचतो ,याचे चित्रण केले आहे.*

## बेभान

*('भान' या कवितेचे विडंबन)*



भानावर आले पाहिले भवती

अवचित आली पुसटशी हाक

घेऊनिया जरी उभे कठोर वास्तव

मी फेंगाडले नाक.

पाण्याचा पडदा थरथरे डोळा

त्यातून दिसावे कसे आरपार?

ग्लिसरीनचा असा प्रताप भारी

वाहे धारा भराभर.

आसवे की रक्त कळले नाही

पदराने डोळे पुसत पुसत

आले पुढे त्याला गेले मी सामोरी

डोळे भरलेले नि सुरी बोटावर, मी होते कांदा कापत.

🤔🤨🤨🤔

*हे एका गंभीर कवितेचे विडंबन असून त्यात विनोदी व खुशखुशीत शैली आहे.*

*या विडंबन कवितेत माणसांची वास्तवाप्रति पराङमुखता व अनृतताही व्यक्त केली आहे.*

## *आता, अगदी जस्ट*

*('आता, अगदी आताच' या कवितेचे विडंबन)*



दाटत आलेल्या काळोखात,

माझ्या मुख्य दाराची बेल फक्त जाणवली,

एक अंधुक सावली बाहेर दिसली.

तिला नव्हता चेहरा, नव्हते नाकडोळे ;

असले तरी मी पाहण्यास तयार नव्हते कारण माझ्या पोटात आले होते भीतीने गोळे!

एक परिचित गंध

हातातल्या बिलांची अस्फुट सळसळ......

सावली आली तशी परतली

कारण मेन स्वीच ऑफ करून मी जागच्या जागी खिळलेली;

छाती फुटेल अशी धडधड,घुसमटता श्वास,

क्षण गोठलेले, सावली व मी निश्चल......

किती तरी वेळाने वातावरण विरघळून वाहू लागले,

मी मेन स्वीच ऑन केले,

आणि बाहेर, दूर जाणाऱ्या पावलांचा व पंख्यांचा गरगर आवाज......

आता ,अगदी जस्ट,

मी निश्वास टाकला,

कारण मी उधार सामान घेतलेल्या

बिलाचा हिशोब घेण्याकरिता आलेला दुकानदाराचा नोकर आत्ताच निघून गेला…..

*या विडंबन कवितेत उधारीकरण व त्याचे परिणाम हे हलक्याफुलक्या शैलीत मांडले आहेत.*

🤫🤭🤫

## *‘सौ’ नाम*

*( ‘ अनाम’ या कवितेचे विडंबन)*



माणूसकाणूसाच्या पलिकडे असतो एक ‘सौ’ नाम प्रदेश ,

जिथे लाटणे – झाडू – भांडयांचे सगळे भेद मिटून जातात ,

सगळेच शब्द फिटून जातात.

उरतो केवळ एक स्वभाव अनंत, सीमाहीन,

त्यात सव्वाशेर मर्दाची होते गरीब बिचारी पाकोळी, फडफडतात पंख,

आदळतात हवेवर,

काही काळ जातो, नवऱ्याचा विरोध होतो नश्वर .

👫 👫 👫

*या विडंबन कवितेत भांडकुदळ पत्नीचे गंमतीशीर वर्णन केले आहे.*

## ***तुझे हात, कुणाचे?की भुताचे?***

*('तुझे हात' या कवितेचे विडंबन*



तुझे हात या क्षणी माझ्या हातांत आहेत,

तुझा गरम श्वास चेहऱ्यावर जाणवतो आहे मला, आणि तरीही तुझी

काळीकुट्ट सावली मैलोगणती दूर माझ्यापासून,

लांबडे करूनी दोन्ही कर,

उभे आहोत आपण……

थरथरत्या थरथरत्या पावलांनी मी करू पाहते पलायन…..

हवेचा असा प्रचंड दाब येतो कानांवर,

की थंडी लागू नये याकरिता कानांत घातलेल्या

कापसांच्या बोळयांमुळे मला जणू आले आहे बहिरे पण!

हे हात… तुझे की माझे ?

हा स्पर्श….. खरा की खोटा?

तू तेथेच आढळलास खवीसा, जिथे भुतांनी हिंडायच्या आहेत चोरवाटा….

आता ही जवळीक केवळ एक भास,

त्यामुळे माझ्या धैर्याचा जाहला ऱ्हास,

अटळपणे गच्च माझे हात का धरलेस रे तू?

अरे बापरे! हे भूत आहे लय बेरके;

ओढून नेत असल्याकारणे हातही बधिर होत चाललेत आणि तेव्हाच…

आणि तेव्हाच मी एक हात सोडवुनी कांद्यामुळी काढते खिशातुनी,

वास येताचि भूत पळाले होऊनी रडके;

👻 👻 👻

*ह्या कवितेत भूताला पळवून लावणाऱ्या कांद्यामुळी अशा कल्पित कथांची खिल्ली उडविली आहे.*

# एक विलक्षण नूर

## *('एक विलक्षण पूल' या कवितेचे विडंबन)*



मी रंगवते आहे

कागदाच्या चिटोऱ्यावर

'तू कसा झाला दास ?

तुला वाटते, तू राजपुत्र,

नि मी बंदिस्त राजकन्या.

तू उगीच रेंगाळतोस माझ्याभोवती

स्वार होऊन मखमली आयाळीवर.

मला वाटतं,

तू श्वानपुत्र,

नि मी गुहेतील शार्दूलकन्या.
तू उगीच लाळ घोटवत फिरतोस माझ्याभोवती,
फिदा होऊन माझ्या सौंदर्यावर .
तुझ्या पावलांचा आवाज पोहोचत असतानाही माझ्यापर्यंत,

तुझे हे असं
लाळ गळवून तोंड वेगाडणे,
किती निरर्थक!
भरधाव पावलांच्या ओझ्याखाली
निरंतर दबलेली कॅनव्हासची पोती
माझ्या चित्रात,
चेपून तुकडे होत असताना,
हे श्वानपुत्रा,
कोणासाठी घेऊन आला आहेस ?
जुनीच चघळलेली हाड़कं,

नवीन ढाब्यावरून?

कडेकोट गुहेचे अवशेष

आणि त्यावर उभ्या

पाठमोऱ्या शार्दूलकन्येच्या डरकाळीतून

कडाडणारे लक्ष लक्ष शब्द

धडकवतायेत


भीतीनं श्वानपुत्राचं हृदय, मनीं भयप्रद थरथर, श्वानपुत्रास दिसला शार्दूलकन्येचा एक विलक्षण नूर.

🐅 🐯 🐯 🐶 🐕 🦮

*या विडंबन कवितेत पुरूषप्रधान व्यवस्थेची खिल्ली उडविली आहे.*

## कात्रींनी

*(‘ मैत्रिणी’ या कवितेचे विडंबन)*



कात्री- कुठूनशी आलीस
अवचित समोर उभी राहिलीस
आणि माझ्या कागदाच्या गळ्यावर
पात उगारलीस.
तुझे दात हसत होते,
पण पात्यांचे टोक बारकाईने माझ्या कागदांचे वेध घेत होते.
मी माझ्या कागदाच्या कागदाच्या गुंडाळीस गुरफटून ठेवलेली,
कागदाची गुंडाळी भेदरट, नेभळट काहीशी भांबावलेली,
आणि मी कागदाभोवती दुसऱ्या कागदाचा एक दुर्भेद्य कोष तयार केलेला....
तो भेदून तू कधी कागदापाशी पोचलीस
कळलेही नाही.
मग तुझ्या तुफान पाती, प्रचंड वार,
आपल्या धारेने कागदात घुसडवत स्वतःच
करकर आवाज करत बसणे,
-जणू मधले कागद काही कापूनच गेले नव्हते.

माझ्या कागदांची गुंडाळी तू हलकेच कापलीस,

माझ्या कागदाला स्पर्शही न करता भोवती भोवती

फिरून,

मूकपणे त्याला उलगडलेस,कापलेस,

तुझा उपहास ,दुःखद सहवास,

आणि अश्मयुगीन अश्मावजारांसमान /सारखी

करकर कापणारी,

कागदी गुंडाळी फाडणारी तुझ्या पातीची सरळ मान,

निरोप देताना क्षणभर हातात चिटुरका भेटला

तो चिटुरका होता तू कापलेला की मी कापलेला?

- अजूनही कळले नाही.

*या विडंबन कवितेत गोड बोलणाऱ्या धूर्त व्यक्तीकरिता कात्रीचे रूपक वापरले आहे.*

*वाट लागते वेलदोड्याच्या दाण्याची*

*(‘ वाट पाहते उजाडण्याची ’या कवितेचे विडंबन)*



दगडी फुलं

श्रीखंडाच्या वड्यांत ल्यायलेला मी

कुटताना वेलदोडा

वाट लागते वेलदोड्याच्या दाण्याची.

कुट कुट खलबत्त्यात कुटते वेलदोडा

गुपचूप तुझ्या अंगणात ठेवलेल्या,

तर तू म्हणे,

विचारत तर नाहीस

चोरट्याप्रमाणे गुपचूप कुटत राहतेस परवानगीशिवाय.

रात्री माझ्या माजघरातला

पाटा – वरवंटा, खलबत्ता,

श्रीखंडाच्या वड्या, वेलदोडा, दगडी फुलं

सजून बसलं असताना

फक्त माझ्यासाठी

कशासाठी चोरत बसतेस

माझ्या घरातल्या या वस्तु ?

माझ्या शेजारणी, हडळे,

बाहेर बेबंद पावले

उडवताहेत चिखल

तुझ्या घरावर अंगणावरचा.

आता तरी येऊन

दे खलबत्ता व वेलदोडे

माफी मागून गुपचूपपणे माझ्या येऊन घरात,

नाहीतर लाकूड जळतं फेकेन तुझ्यावर

विस्तवाचं.

*या विडंबन कवितेत शेजाऱ्यांच्या वैमनस्याचे वर्णन केले आहे.*

## सवितेचे रौद्ररूप

*(‘कवितेचे शब्दरूप’ या कवितेचे विडंबन)*



तुम्ही जेव्हा बोलत असता ना भरभरून
लावत असता दोषारोप तिच्यावर/ सवितेवर,
तेव्हा ती शोधत राहते फाडण्याकरिता
तुमची कागदपत्रे अथवा महत्त्वाचा फॉर्म
आणि मग लावताना अर्थ
प्रत्येक दोषारोपाचा तपासत राहते
नजरेनंच
प्रत्येक कागदपत्रांचे संभाव्य महत्त्व.
सविता अनुभववाशी वाटली असे वाटते
मनातून - खोल हृदयातून
तेव्हा हे माहित असायला हवं तुम्हांला
म्हणून तुम्ही चारचौघांत
भिडा तिच्याशी
आणि कुटा तिच्यावर क्रुद्ध शब्दांच्या मिरच्या.

तेव्हाच्या सवितेच्या रौद्ररूपावर

तुम्हांला आठवत राहील

आपल्या बायकोचा

आकाश भेदणारा

भांडकुदळ आवाज.

😠 😠 😠

*या विडंबन कवितेत कविता नायिका आपल्या मैत्रिणीच्या चिडचिड्या स्वभावाचे चित्रण करत आहे.*

## *‘ स्पेशल’ वधस्तंभाकडे*

### *( ‘वधस्तंभाकडे’ या कवितेचे विडंबन)*



चढणारी हळद,

हिरव्या – लाल – पिवळया कंदिल्यांची मिणमिण,

पंचारतीची ज्योत

तोंडासमोरून असताना फिरत

मी घेऊन चाललोय त्याला

‘स्पेशल’ वधस्तंभाकडे .

त्याची पावलं उत्सुक

वादळाला भेटण्यासाठी,

तोंडातील नोट

दातांत गच्च धरताना तो ती नोट ओली करून टाकतो

त्याच्या उपरण्याला जोडलेली

तिची शाल.

लग्नमंडपातल्या वऱ्हाडाच्या महापुरामध्ये,

मला उगीच वाटत राहते,

लग्नवेदी वधस्तंभाचेच दुसरे नाव,

आणि वाऱ्यावर उडणाऱ्या अग्निज्वाला

त्याचा घेऊ पाहतात घास.

*या विडंबन कवितेत नवऱ्याच्या मित्राच्या मनात लग्नवेदीबद्दलचे गंमतीशीर विचार दाखवले आहेत.*

## *भात*

*(‘कात’ या कवितेचे विडंबन)*



आपल्याला नाही टाकता येत इतरांसारखा भात,

‘दम बिर्याणी' तयार करूनी पतीस देता न येत,

आणि यदाकदाचित टाकलाच जरी शिळा भात नवऱ्याच्या ताटात ,

तरी त्यातला थोडा घेऊन आपण बसतो खात,

दुसऱ्या बायकांची ‘दम बिर्याणी' पाहून आपण

राहतो मुकाट जळत.

पण हे एकदा उमगले तर सारेच सोपे किती? कसलीही नवऱ्याची बाळगायला नको मग भीती : फक्त टाकावी फोडणी शिळया भातात फिरून, घशात नवऱ्याच्या ओतावी ‘दम बिर्याणी' दम देऊन !

*या विडंबन कवितेत स्त्रियांचा जेवण बनवण्याविषयी*
*कंटाळा दिसून येतो.*

## दाभण

*(' गाभण' या कवितेचे विडंबन)*




पिवळी दाभण किंवा रंगाची गाजरी

माझ्या पायांजवळच पडलेली.

निष्काळजीने,बेफिकीरीने हातातून निसटलेली. दाभण मध्येच चाटून

जाते माझ्या पायांची बोटं

आणि टाचांनाही.

चकाकत्या स्टीलवर अपार काठिन्य,

लावलेला रंग, साऱ्या जगाला सतत टोचत राहणे,

दाभण वाटते मला शल्याप्रमाणे.

माझ्या नजरेसमोर दिसू लागते,

दाभण पायांना टोचणारी,

अंगातून रक्त काढणारी,

कधीतरी क्वचित कागदांना जोडणारी.

आणि दुसऱ्याच क्षणी……

करकचून टाकलेल्या कपड्यांची गगाठोडी

बूट काळे,

पडलेले कागद तसेच कापसाचे बोळे,

मग दिसते मी केविलवाणी भारी,

कारण मला हातांची जोडी दिसते एका

दाभणाने ते सर्व जोडण्याचा प्रयत्न करणारी

राग आल्यावर सारे विस्कटवून टाकणारी

हे सर्व कोण करते,

मी पाहते

……आणि माझ्यासमोरच माझा नवरा शिंकदर

तोऱ्यात झुकलेला,

कपड्यांची गाठोडी,बूट, कागद, कापसाचे

बोळे एका दाभणीने जोडू पाहणारा,

अत्यंत अडाणी बिचारा……

मी दचकते,भानावर घेते, कासावीस होऊन ओरडते,  ते कपडे माझे आहेत, दाभणीने जोडून फाडू नको नाहीतर आजचा जेवणाचा बेत कॅन्सल आहे!

*दाभणीने कागद , कापडाचे तुकडे जोडता येतात.*

*मात्र कपडे, बूट व तत्सम वस्तू एकत्र जोडणं शक्य नसतं.*

*कधी कधी व्यक्ति बुद्धीला बाजूला ठेवून कार्य करते, त्यामुळे त्याची उडणारी त्रेधातिरपीट दाखवली आहे.*

## *लोकलच्या डब्यात भिडलेली अनामिका*

## *('लोकलच्या डब्यात भेटलेली अनामिका' या कवितेचे विडंबन)*



तिचे डोळे अंगारी असे माझ्या डोळ्यांशी का भिडलेले?

नक्कीच तिला दिसत असावा

तिच्या खांद्यावर रोवलेला माझा कोपरा

किंवा माझ्या हातातील तिच्या पाठीला

टोचत असलेली चटई.

कदाचित ती पाहत असेल

गर्दीने भरलेल्या डब्यात

माझे तिला कोपराने ढोसकणे

अथवा गुदमरलेल्या श्वासांना
मोकळे करण्यासाठी बायकांचे एकमेकांना ढकलणे. ती वाचतही
असेल
निवेदन,
आवाहन,
‘गर्दी टाळा,रेल्वेचे नियम पाळा’ या सूचनेचे.

पोटाबाहेरची पर्स,
पोटावरच्या ओढणींची गादी करून
पहुडलेली असताना निवांत
साठवतही असेल डोळ्यांत
पाकीटमारांपासून सावध राहण्याची सूचना निवेशित.

तिचे डोळे हे असे
मध्येच का फुलले?
तिला दिसली तर असेल ना,
रिकामी झालेली चौथी सीट,
की सीट हवी आहे का, असे म्हणून

नुकतीच उठणारी एखादी स्त्री?

जर यदाकदाचित तिला दिसली असेल

तर त्याआधी मला त्या सीटचा ताबा घेतला पाहिजे!

या विडंबन कवितेत लोकल ट्रेनमध्ये प्रवाश्यांच्या गर्दीमुळे होणाऱ्या धक्काबुक्कीचे वर्णन केले आहे.

**<u>मख्ख</u>**

*<u>('रख्ख' या कवितेचे विडंबन)</u>*




मख्ख तोंडावळा,भाव दीन,

काळवंडलेल्या सारखा,

सुके राठ केस,

बिना तेलपाणीचे.

विझलेल्या डोळ्यांचे

खालती इथे तिथे काळे डाग,

गाल मागे ओढलेले
कान करती त्यांचा माग.

हसतानाच मुरडला
मध्येच ओठ,
केसांची बांधलेली
डोक्यावर चित्रविचित्र मोट.

पारदर्शक कपड्यांतून अवघी
दिसते कृश काया,
अशा मख्ख चेहऱ्यावर बसणारही
नाहीत माशा.



*या विडंबन कवितेत मख्ख व विचित्र व्यक्तिमत्त्वाच्या माणसाचे चित्रण केले आहे.*

## कचऱ्याच्या रांगेत चाललीस भल्या दुपारी

*('दवांत आलिस भल्या पहाटीं' या कवितेचे विडंबन)*



कचऱ्याच्या रांगेत चाललीस भल्या दुपारी

श्रीमंताच्या तोऱ्यात एकदा;

जवळुनि गेलिस हळूहळु आपुल्या हातातील

सांडवित कचऱ्याचा डब्बा.

अडलिस आणिक पुढे जराशी

पुढे जराशी, हसलीस;

- मागे

वळुनि पाहणे विसरलीस का?

विसरलीस का फलकांवरील सूचना

‘ येथे कचरा टाकू नये?’

लक्ष कुठे अन् कुठे कचऱ्याचा डब्बा,

अस्वच्छतेचा कसा इशारा;

. अतिशहाणी ही, हिच्या डोळयांमध्ये

मसाला भरा !

अनोळख्याने ओळख कैसी

दाखवावी हे सांग;

कोंदट- सुक्या कचऱ्याच्या

. ढिगांची एथेच लागली रांग !

हातातला कचऱ्याचा डबा
कुणी खेचावा, कुणी अलगद फेकावा ;
तांबूस निर्मल डब्यांवरी अन्
फलकांवरी कुणी कुणी किती किती सूचना लिहाव्या !

कचऱ्यांच्या रांगेत चाललीस भल्या दुपारी,
डस्टबीनच्या शोभेत अन् सोबत एकदा;
जवळुनि गेलिस अपुल्या
हातातील मजवरी फेकत कचरा.

*या विडंबन कवितेत व्यक्तींची कचराव्यवस्थापनाप्रति बेफिकीरी वृत्ती दिसून येते.*

## मूठ ही आवळली

*('मूठ ही आवळली आता' या कवितेचे विडंबन)*



मूठ ही आवळली आता
मूठ ही आवळली आता

मूठ ही आवळली आता
विडा हा उचलाला आता
विडा हा उचलला आता
तोडांत टाकुनी गिळला न चावतां,
मूठ ही आवळली आता ||१||

मूठ ही आवळली आता
रणज्वराचा चेव मनी चढता
आता म्हणू
लढू, लढू,
मारू, मारू
मार खावू तोंड दाबता
मूठ ही आवळली आता ||२||

मूठ ही आवळली आता,

मूठ ही आवळली आता,

मूठ ही दुखते आवळतां,

किती वेळ मूठ आवळू?

सैल मूठ करता बोटं लागतात दुखू,

शांतपणे बोटांना तेल लावूनी

म्हणूया आता……

मूठ ही सैलावली आता,

तेल बोटांना लावतां,

दुखणे बंद झाले आता,

हात हे वरती केले आता,

मूठ ही कशाला आवळावी आता?

तरीही मूठ ही आवळली आता॥३॥

✊ ✊ ✊

*या विडंबन कवितेत शूरवीराचा आव आणणाऱ्या माणसांचा पळपुटेपणा दिसून येतो.*

## *रापी १*

## *(' रापी' या कवितेचे विडंबन)*



चायनीनखाया पुल

पुलखले नाला

नाला किनारे मॅच्युरीनचो दुकान नां तोरो?

रोज मन्च्युरीयन खात होबे

मस्तिरा पूछे बापू

इस्कूल मे,

तू मॅच्युरीयन लास कां नहीं बापू ?

टुरी

धंदा अपनो चले नहीं

कोबी की भाजी कापे नहीं

जिते उते छुरीचो झंझोटा

कर ले अपनो घाटा

बापू?

अपने को मंच्युरियन करता आये नहीं कां?

टुरी

धार के बिना छुरी ना कर सके मात

ओको [कोबी को} कसो काटता आये ?

पागल रे बापू तू,

तब रापी कोन्ते कामकी?

🔪🔪🔪🥗🥬

## *रापी २*

*(‘रापी’ या कवितेचे दुसरे विडंबन)*



चिकनखाया पुल

पुलखले नाला

नाला किनारे चिकनाचो दुकान नां तोरो

रोज चिकन फ्राईड राइस खात होबे,

माशीमारा पूछे बापू

इस्कुल मे ?

तू चिकनफ्राइड राइस लास कां नहीं बापू?

टुरी

धंदा अपनो चले नहीं

चिकन के टुकडे कापता येत नहीं

जिते उते छुरीचो झंझोटा

करलिया अपनो घाटा

धारबाले ने मुँहे ये फेरा घंघोटा

बापू?

अपने को चिकन काटना आये नहीं कां?

टुरी

बिनधारबाली छुरी कचरे के डिब्बे में है जात,

चिकनोको कसो काटता आये?

पागल रे बापू तू,

तब रापी कोन्ते कामकी?

*या दोन्ही विडंबन कवितांत चांभाराने चिकनचे व चायनीजचे दुकान उघडले आहे,मात्र त्याच्याकडे असलेला सुरा चिकन व कोबी कापून- कापून बोथट झाला आहे. तेव्हा त्याची मुलगी असा सल्ला देते, की औचित्यभंग होतो.*

## *माती*

*(' माती' या कवितेचे विडंबन)*



माती माती माती

माती करे सोन्यातून

सोन्याची करे पूर्ण.        बोऱ्हाटी.

उंच उड़े एक,

उंच उडे जरी,

त्याच्या आत्मविश्वासाची दोरी   खेचूनि खाली

.                    पाडविसी.

म्हणोनीच एक गेला वर,

ऐसा काढिसी गळा,जसी

पडली सामोरी दहांची कलेवरं

मरण्यापूर्वी घेसी तोंडसुख त्यावर

पर मेल्यानंतर गुणगान.

*या विडंबन कवितेत लोकांची मानसिकता दाखवली आहे*

## जफर आणि मी

*('जफर आणि मी' या कवितेचे विडंबन)*



जफरच्या घरी रमजानचं शरबत प्यालो

त्याच्या निकाहला शाही बिरयानी

त्याची आई माझ्याच आईसारखी

मोबाईल बघत जागल्यामुळे डोळे सुजलेली व मेकअप थोपल्यामुळे

चेहऱ्यावरचे छिलके निघालेली

त्याच्या भिंती माझ्याच घराच्या भिंताडासारख्या

कुठे कुठे वॉलपेपरचे तुकडे निघालेल्या

त्याचे बाबा हळहळतात माझ्याच बाबांसारखं
'इंडेक्स' गडगडण्याच्या दिवसांबद्दल बोलताना.

त्याच्या घरातील शेजवान चटणी
माझ्याच दुकानातल्या विकायला ठेवलेल्या चटणीसारखी.
त्याच्या आमटीची तूर
माझ्याच दुकानातनं उधार मागवलेली.

माझ्या घराच्या उंबऱ्यावर पडलेला कचरा
त्याच्या घराच्या आवारातल्या
डस्टबीनमधून आलेला.

तोही 'पुणे- मुंबई-पुणे' पिक्चर पाहून आलेला
मीही कितीतरी वेळा 'तिसरी मंजिल ' पर्यंत चढून गेलेलो
गुडघ्याचा त्रास असूनही बायकोबरोबर
त्याला मला समकालीन वाटत आलेला सलमान खान व रितेश देशमुख

कितीतरी दिवस आतड्यातल्या अल्सरसारखी छळत राहिलेली मला,

त्याच्या आईला मोतिबिंदू झाल्याची बातमी
आम्ही अफवा नव्हतो
आम्ही जाहिरातीची लेबलं नव्हतो
आम्ही होतो योजना करणारे
अमेरिकेला – ब्रिटनला जाण्याची
मुलांना शिकवण्यासाठी चालवलेली तंगडतोड एकवेळया ‘रोखा’ विकण्यासाठी
चालवलेला वर्षभराचा आकांत.

काय माहित मात्र काही दिवसांपासून कोणीतरी फिरवतोय
गल्लीमोहल्ल्यातून आपला रोखा रखडल्यामुळे मी जफराचा मत्सर
करत असल्याची पत्रकं.

👭 👭

*मध्यमवर्ग हा धर्मभेदी नसतो,मात्र अमेरिकेला वा ब्रिटनला जाव्याची उच्च स्वप्ने पाहणारा पण आपला रोखा रखडल्यामुळे व दुसऱ्याच्या रोख्यांची खरेदी विक्री सुलभ चालल्यामुळे मत्सर करणारा असतो, याचं मार्मिक वर्णन या विडंबन कवितेत केलेलं आहे. तसेच श्रीमंतांचे अनुकरण करताना होणारे नुकसान औपरोधिक वक्रोक्तीने दाखवले आहे.*

## आंघोळी

## (‘रांगोळी’ या कवितेचे विडंबन)



कडीकोट चार भिंतींच्या चौकटीत घडणारे

असंख्य बंदिस्त, पण मोठ्याने बोललेले

बाथसॉंग,

ओली शरीर थंडीमध्ये बर्फाप्रमाणे गोठून

राहतात,

त्या गोठण्यात

पाणी घेताना भिंतीला निदान डोके तरी थडकत नाही.

पण इथे

गरगरत्या पंख्यात एसीमध्ये
जीव अडकावा
तसा मात्र बाथरूममध्ये
आंघोळीनंतरही चालूच असतो शॉवर,

त्या गरगरत्या पंख्यांमुळे – थंडगार
एसीमुळे
येणारी वाढत्या आकड्यांची बिलं
पाहून
मी एकेक दिवशी थंड पाण्याने आंघोळीचा निर्णय घेत आहे.

या विडंबन कवितेत माणसांचा वीज वापर व जलसंवर्धनाबाबत असलेला निष्काळजीपणा दिसून येतो.

## *विचारावा अर्थ*

*(‘ विचारावा अर्थ’ या कवितेचे विडंबन)*

विदयार्थ्याला विचारावा

ऑनलाईन लेक्चरचा अर्थ






एमसीक्यूचा अर्थ

कॅंडीडेटला

नोकरदाराला विचारावा

‘वर्क फ्रॉम होम’ चा अर्थ

लॉकडाऊनचा अर्थ

संचार स्वातंत्र्याला







या लॉकडाऊनमधे प्रत्येक कार्याचे स्वरूप बदलले आहे, उदा. ऑनलाईन शिक्षण, वर्क फ्रॉम होम, लॉकडाऊन व संचारस्वातंत्र्य या संकल्पनाही बदलल्या आहेत.

## *माझी पाच-सहा वर्षांची पोरगी*

*('माझी पाच-सहा वर्षांची पोरगी' या कवितेचे विडंबन)*

माझी पाच सहा वर्षांची पोरगी,



भलं मोठं टॅबचे ओझं तळहातावर

अलगद सांभाळत रोज ऑनलाईन

स्कूल अटेंड करते घरी.

ऑनलाईन स्कूल झाल्यानंतर उतरवून

घेते मी ते ओझं.

पण भीतीच वाटते मला.

उद्या कधीही मोठी झाल्यावर
अटेंड केलेच तिने चार दिवस
ऑनलाईन क्लास,तर
ती डिग्री परीक्षा ऑनलाईनच
देण्याचा हट्ट नाही धरणार ना?

👧👧👧👩‍💻

सद्यस्थितीत लॉकडाऊन असल्याने मुलांना वर्चुअल प्रकारे शिक्षण दिले जात आहे.त्यामुळे मुलं प्रत्यक्ष अभ्यास करणं व शाळेत जाणं विसरून जातील, अशी भीती  या विडंबन कवितेत हलक्याफुलक्या शैलीतून व्यक्त केली आहे.

## मळमळ

*(‘ अटळ’ या कवितेचे विडंबन)*

शेवटी ती मळमळच असते......

वर वर उरात उसळत जाणे......

होते नव्हते ते पोटात परि उलटत येणे......

शेवटी ती मळमळच असते......

महागातच पडते

. गोड-तिखट पदार्थ एकत्रच

घशाखाली उतरत जाणे......

क्षितीजावेळी डोळे लाल

सताड मिटत जाणे......



😟 😟 🤮 🤮

या विडंबन कवितेत पित्त व त्याची कारणे मजेशीर रीत्या मांडली आहेत.

## जोकगीत

*(‘शोकगीत' या कवितेचे विडंबन)*



तू चाललीस, तेव्हा

निशा रेंगाळत होती रूमबाहेरच,पाऊलांचे

अधीरेपण,

सांभाळीत सासरच्या अंगणातील कारल्याच्या

वेलीसारखी

सरकत होती तिची पावले माझ्याकडे पुढे-पुढे,

केशरी कार्पेटवर,

कथेतून निसटणाऱ्या – मात्र नायकाच्या दुसऱ्या प्रेयसीच्या खुळया

हट्टासारखी.

मी मागे वळून होतो,'ती जातेय,

नंतर तू माझ्या जवळ ये!’ असा होतो खुणावत

त्या मंद प्रकाशात!

त्या मंद प्रकाशातील सावल्यांनी

केलेल्या जोकमुळे हसत असावा या रुमचा आत्मा…

अन् प्रिये! वर्म झालीस तू निशाच्या बाहेर रेंगाळण्याचे नि माझ्या तिची वाट पाहण्याचे ;

या विराट निःशब्दतेच्या पार्श्वभूमीवर……

……. पण गहाण माझे लव्ह / प्रेम केवळ निशाने केलेल्या जोकवर!

🃏 🃏 🤡

या विडंबन कवितेत दोन प्रेयसींचा प्रियकर असलेल्या पुरूषाची पहिल्या प्रेयसीसमोर पोल खोल होते, याचं गंमतीशीर वर्णन केले आहे.

## *करवतीची पात*

*(‘फुलवात’ या कवितेचे विडंबन)*



घनघोर अंधारात

चकाकती धार लावून चमकवलेली

लावियेली करवतीची पात.

तुवा तुझिया हाती

उजळले दिव्य मोती

कोनाकोनी खुले चमकदार हिरा,

सरे अंधाराची छाया.

तेज पसरे अशांत,

लालसा उद्भवली मनात.

खजिन्याचं द्वार खुले,

जे शिंपल्यामधूनीया आले

अन् तुझिया हाती व्यर्थचि पडले.

तमातुनी ये प्रकाश, चैतन्य आणी मम भाग्यास.

हिऱ्यामधुनी -मोत्यांमधुनी प्रचिती

लुटूया सारे वैभव ऐसा भाव आला चित्ती.

फुटे तांबडे काळोखाला,

तैसा तो साथीदारांस सांगे, “पटकन

चला, माल लुटून!”

पण तीच करवतीची पात,

होती अस्फुट अंधारात,

तिनेच केला घात!

या विडंबन कवितेत दोन खजिना तस्करांची गोष्ट आहे, जे एकाच खजिन्यापायी भांडतात, मात्र तिसराच सुतार करवतीचा वापर करून तो खजिना मिळवतो.

## बायका खोळंबून आहेत बसस्टॉपवर

*(‘बायका खोळंबून आहेत काठावर’ या कवितेचे विडंबन)*



बायका खोळंबुन आहेत बस स्टॉपवर

एकमेकांची विचित्रशी बडबड सहन करीत.

क्वचित येतो पैलाडीतून अस्फुटसा पुकारा,

“पनवेलची बस आली,उतरा,उतरा.”

बस – कंडक्टरनं शिट्टी फुंकल्यागत
की उत्तेजित होतो लगेच अवघा कळप
ओठ गोठवून नि रोखून कुजबुज
कान लावून वेध घेतो अवघ्या इंद्रियोनिशी
की अमुक तमुक
शहराची बस गेली का निघून ?

मागाहून कुणीतरी हसतं ओरडतं,
एप्रिल फुल बनाया, तुमको घुस्सा आया!
ते ऐकून चाचपडत काहीही काठी किंवा चपला, पटापट लालेलाल
होतात प्रत्येकीचे चेहरे.
पण जेव्हा निसटतो तो हातातून
एप्रिलफुल करून,
प्रत्येकजण राहते दातओठ चालत.

कुणीतरी असं करत होते
खरं की काय?
बायका तेवढ्याच खोळंबून असतात

हातातील मोठमोठ्या बॅगा सांभाळत,
घडलेल्या इतिवृत्ताचा कित्ता गिरवत,
बस येईपर्यंत बसस्टॉपवर.

या विडंबन कवितेत स्त्रियांची कोणत्याही परिस्थितीत गप्पा मारण्याविषयी आत्मीयता दिसून येते.

# परिशिष्ट

1. रत्नांच्या जाहल्या खापरखुंटी ही शीर्षककविता आहे. यात गंभीर व सुंदर कवितांचे विडंबन कसे केले जाते याचे मजेशीर वर्णन केले आहे.
2. थांब - ' खांब' या कवितेचे विडंबन –
    a. 'खांब' ही कविता शांता शेळके यांची असून या कवितेत स्त्रीच्या सामर्थ्याचे चित्रण केले आहे.
3. जानीमानी - ' आणीबाणी' या कवितेचे विडंबन – ' आणीबाणी' ही कविता कवि अनिलांची असून त्यात नायकाचे प्रौढ, परिपक्व परिणित जीवन मांडले आहे.
4. ' या लग्नात मिटे न विग्रहभाषा' – ' या जन्माला फुटे न भाषा' या कवितेचे विडंबन – ' या जन्माला फुटे न भाषा' ही विं.दा. करंदीकर यांची कविता असून या कवितेत प्रियकर- प्रेयसीच्या अबोल्याचे वर्णन केले आहे.
5. ' अध:पतित शहराविषयी' - नव्या शहराविषयी' या कवितेचे विडंबन –नव्या शहराविषयी' ही कविता लोकनाथ यशवंत यांची कविता असून या कवितेत नव्या शहरातील अपप्रवृत्तींचे भयावह चित्रण आहे.
6. ' विचार तरूणाईचे' – विचार या कवितेचे विडंबन – विचार ही कविता नारायण सुर्वे यांची असून त्यात कामगार आपल्या पत्नीचे साहचर्य इच्छितो.

7. ‘ नाल्यागटाराकाठी’ - तळयाकाठी या कवितेचे विडंबन - तळयाकाठी ही कविता कवि अनिलांची असून या कवितेत सुंदर तळयाचे स्वप्नील वर्णन आहे.
8. माणसा, असमर्थ तू! – ‘ माणसा, समर्थ तू!’ या कवितेचे विडंबन – ‘माणसा, समर्थ तू!’ ही कविता ग.दि. माडगूळकर यांची असून त्यात माणसाला प्रोत्साहित केले होते.
9. बेभान – ‘भान’ या कवितेचे विडंबन –भान’ ही कविता शांता शेळके यांची असून त्यात गंभीर वास्तवतेचे चित्रण केले आहे.
10. आता, अगदी जस्ट – ‘ आता, अगदी आताच' या कवितेचे विडंबन –‘ आता, अगदी आताच’ ही कविता शांता शेळके यांची कविता असून ही गूढरम्य कविता आहे.
11. ‘ सौ' नाम - ' अनाम’ या कवितेचे विडंबन- ‘ अनाम’ ही कविता शांता शेळके यांची कविता असून ही गूढरम्य कविता आहे.
12. तुझे हात,कुणाचे? की भुताचे? - 'तुझे हात' या कवितेचे विडंबन – 'तुझे हात' ही कविता शांता शेळके यांची असून त्यात प्रियकर आणि प्रेयसीच्या दुरावा व जवळीकीचे वर्णन आहे.
13. एक विलक्षण नूर - ' एक विलक्षण पूल' या कवितेचे विडंबन – ' एक विलक्षण पूल' ही कविता प्रज्ञा दया पवार यांची असून त्यात स्त्रीच्या तुटत्या स्वप्नांचे विदारक चित्रण आहे.
14. कात्रींनी – ‘ मैत्रिणी' या कवितेचे विडंबन – ‘मैत्रिणी' ही कविता शांता शेळके यांची असून त्यात मैत्रीच्या मधुर पण मूक बंधाला हळुवार उलगडले आहे.

15. वाट लागते वेलदोड्याच्या दाण्याची –‘ वाट पाहते उजाडण्याची’या कवितेचे विडंबन –‘ वाट पाहते उजाडण्याची’ही कविता प्रज्ञा दया पवार यांची असून त्यात स्त्री दु:खाच्या अंधारात आशेच्या किरणाची वाट पाहते.
16. सवितेचं रौद्ररूप - ' कवितेचे शब्दरूप' या कवितेचे विडंबन - ' कवितेचे शब्दरूप' ही कविता शांता शेळके यांची असून त्यात कविता शब्दरूपांनी कशी बहरते, याचे वर्णन आहे.
17. ‘ स्पेशल' वधस्तंभाकडे – वधस्तंभाकडे’ या कवितेचे विडंबन- ‘ वधस्तंभाकडे’ ही कविता प्रज्ञा दया पवार यांची कविता असून ती गंभीर आशयाची कविता आहे.
18. भात - ' कात' या कवितेचे विडंबन- ‘कात’ ही कविता शांता शेळके यांची असून त्यात दु:खाची कात टाकून उजळणाऱ्या माणसाची प्रवृत्ती दाखवली आहे.
19. दाभण – ‘ गाभण' या कवितेचे विडंबन – गाभण' ही कविता शांता शेळके यांची असून त्यात गाभण मांजर व तिच्या पिल्लांना मारणाऱ्या दुष्ट बोका या दोन्ही प्रवाहांतून मांजरीचे दु:खी मातृह्दय दिसून येते.
20. लोकलच्या डब्यात भिडलेली अनामिका –‘लोकलच्या डब्यात भेटलेली अनामिका’ या कवितेचे विडंबन- 'लोकलच्या डब्यात भेटलेली अनामिका’ ही कविता प्रज्ञा दया पवार यांची असून त्यात धकाधकीचा प्रवास करणाऱ्या गर्भवती युवतीचे वर्णन आहे.
21. मख्ख - ' रख्ख' या कवितेचे विडंबन – रख्ख' ही कविता शांता शेळके यांची असून ही गंभीर आशयाची कविता आहे.

22. कचऱ्याच्या रांगेत चाललीस भल्या दुपारी - ' दवांत आलिस भल्या पहाटीं' या कवितेचे विडंबन - ' दवांत आलिस भल्या पहाटीं' ही कविता बा.सी. मर्ढेकरांची असून या कवितेत प्रेयसीच्या आगमनाचे अलंकारिक भाषेत वर्णन आहे.
23. मूठ ही आवळली - ' मूठ ही आवळली आता' या कवितेचे विडंबन -मूठ ही आवळली आता' ही कविता अज्ञात कवीची असून त्यात भटक्या जमातीतील लोकांची अवस्था दर्शवली आहे.
24. रापी १
25. रापी २ - ' रापी' या कवितेची विडंबने – ' रापी' ही कविता आनंद गायकवाडांची असून त्यात चांभाराची मुलगी त्याला विद्रोहाची प्रेरणा देते.
26. माती - ' माती' या कवितेचे विडंबन- माती' ही कविता मधुकर केचेंची असून त्यात आपण ज्या मातीत जन्मलो आहोत, त्याचा विसर पडू देऊ नये असा संदेश या कवितेतून दिलेला आहे.
27. जफर आणि मी- ‘ जफर आणि मी' या कवितेचे विडंबन - ‘ जफर आणि मी' ही कविता वर्ज्रेश सोलंकी यांची असून त्यात स्वार्थासाठी भिन्नधर्मीयांना द्वेष करण्यास भाग पाडणाऱ्या लोकांविषयी तिरस्कार व्यक्त करत भिन्नधर्मीयांतील भेद नसल्याचे स्पष्ट केले आहे.
28. आंघोळी – ‘रांगोळी' या कवितेचे विडंबन - रांगोळी' ही कविता सामाजिक विषयावर आधारित असून या कवितेची कवयित्री रजनी परुळेकर आहे.

29. विचारावा अर्थ – ‘ विचारावा अर्थ' या कवितेचे विडंबन – ‘ विचारावा अर्थ’ ही कविता रोहीदास पोटेंची असून जगण्याचा अर्थ प्रत्येक गोष्टीला विचारला पाहिजे, असा या कवितेचा आशय आहे.
30. माझी पाच-सहा वर्षांची पोरगी - '. माझी पाच-सहा वर्षांची पोरगी’ या कवितेचे विडंबन – ‘माझी पाच-सहा वर्षांची पोरगी’ ही कविता संध्या रंगारींची असून त्यात सासरी नांदायला गेल्यानंतर मुलीच्या वाटूयाला येणाऱ्या दु:खाची आईला चिंता वाटते.
31. मळमळ - ' अटळ' या कवितेचे विडंबन – ' अटळ' ही कविता शांता शेळके यांची असून त्यात अटळ वास्तवाची जाणीव करून दिली आहे.
32. जोकगीत – “ शोकगीत” या कवितेचे विडंबन - शोकगीत” ही कविता ग्रेसची असून त्यात प्रियकर आणि प्रेयसीच्या ताटातूटीचं वर्णन आहे.
33. करवतीची पात - ' फुलवात' या कवितेचे विडंबन - ' फुलवात' ही कविता कवि अनिलांची असून त्यात प्रियकर आणि प्रेयसीच्या तेजस्वी मीलनाचे चित्रण आहे.


बायका खोळंबून आहेत बसस्टॉपवर – ‘बायका खोळंबून आहेत काठावर' या कवितेचे विडंबन - बायका खोळंबून आहेत काठावर' ही कविता प्रवीण दशरथ बांदेकर यांची असून, ही कविता स्त्रीप्रधान आहे.

***माझ्या कविता वाचून कशा वाटल्या, हे सांगायचे असेल तर,***

***मला 'shaktileelanikita@gmail.com'***

***या इमेल आयडी वर रिप्लाय द्या.***

## निकिता पाटील यांचे ई साहित्यवरचे पहिले पुस्तक




पुस्तक वाचण्यासाठी कव्हरवर क्लिक करा

**ई साहित्य प्रतिष्ठानला तेरा वर्षं पूर्ण होत आहेत.**
**निकिता पाटील यांचं ई साहित्यचं हे दुसरं पुस्तक.**

निकिता राजेश पाटील ही मूळची डोंबिवलीची असून सद्यकालात तिचे वास्तव्य ३ वर्षांपासून वांगणीत आहे. कुटुंबात लेखनाचा वा साहित्याचा वारसा असा नाही. पण अगदी शालेय वयातच तिला लेखनाची ऊर्मी शांत बसू देईना. वयाच्या तेराव्या वर्षापर्यंत तिने पूर्ण पुस्तक होईल इतके लिहिले. नंतर मराठी साहित्याचा रितसर अभ्यास करून आता ती साहित्याच्या वेगवेगळ्या रसांच्या निर्मितीचा अनुभव घेत आहे. तिने लिहिलेल्या 'सस्पेशियस वुमेन' या पहिल्याच कथासंग्रहाचे कौतुक वाचकांनी केले आहे. सध्या ती आपल्या तिसऱ्या व चौथ्या पुस्तकाच्या तयारीत आहे.

असे अनेक तरूण लेखक खूप छान लिहीत आहेत. पण त्यांची पुस्तकं प्रकाशित करायला प्रकाशक धजावत नाहीत. कारण त्यांचे नाव प्रसिद्ध नसल्यामुळे त्यांच्या पुस्तकविक्रीबद्दल प्रकाशक साशंक असतात. जर या लेखकांची पुस्तके वाचकांसमोर आली नाही तर त्यांचे नांव प्रसिद्ध होणार कसे? या दुष्टचक्रात सापडून अनेक तरूण लेखकांच्या पिढ्या बरबाद झाल्या. पण आता इंटरनेटवर नवलेखकांना वाचकांपर्यंत नेण्याचे काम अनेक संस्था करत आहेत.

ई साहित्य प्रतिष्ठान त्यातील एक. ६ लाख वाचकांपर्यंत या नवीन लेखकांना नेण्याचे काम ही संस्था करते. पूर्ण विनामूल्य. लेखकांनाही कोणताही खर्च नाही. भविष्य काळात लेखकांना भरघोस मानधन देण्यासाठी ई साहित्यचे प्रयत्न चालू आहेत. नवनवीन ताकदवान लेखक ई साहित्याकडे वळत आहेत. त्यांना प्रतिसादही मिळतो. कुणाला भरघोस स्तुती तर काहींच्या वाट्याला टीकाही येते. या टीकेला positively घेऊन हे लेखक आपला कस वाढवत नेतात. सुरूची नाईक, प्रफ़ुल शेजव, भाग्यश्री पाटील, कोमल मानकर, सुरज गाताडे, अनूप साळगावकर, बाळासाहेब शिंपी, चंदन विचारे, सौरभ वागळे, यशराज पारखी, चंद्रशेखर सावंत, संयम बागायतकर, ओंकार झांजे, पंकज घारे, विनायक पोतदार, चंद्रकांत शिंदे, निरंजन कुलकर्णी, चारुलता विसपुते, कार्तिक हजारे, गणेश सानप, मनोज चापके, महेश जाधव, मनोज गिरसे, मृदुला पाटील, निलेश देसाई, सनहा पठाण, संजय बनसोडे, संजय येरणे, शंतनू पाठक, श्रेणिक सरडे, शुभम रोकडे, सुधाकर तळवडेकर, दिप्ती काबाडे, भूपेश कुंभार, सोनाली सामंत, केतकी शहा, विनिता देशपांडे, सौरभ कोरगांवकर, मिलिंद कुलकर्णी, शुभम पाटील, आशिष कर्ले, सुरेंद्र पाथरकर, प्रीती सावंत दळवी, निमिष सोनार, उमा कोल्हे, गणेश ढोले, सचिन तोडकर, महेश पाठाडे, अभिजीत पैठणपगारे, कार्तिक हजारे, किरण दशमुखे, जगदिश खांदेवाले, माधुरी नाईक, विशाल दळवी, गौरी कुलकर्णी, जितेश उबाळे, प्रितम साळुंखे, कुमार सोनावणे, प्रतिक उकले, सुजाता सिद्धा, गायत्री रोडे, मनोज कळमकर, काजल दळवी, सचिन

बोरसे, कार्तिकी भट, डॉ. प्रितम दरवडे, अमोल गवळी, निकिता पाटील, संजीवनी देशपांडे, निकिता पाटील असे अनेक तरूण लेखक सातत्यपूर्ण लेखन करत आहेत.

इंटरनेटवर हौशी मराठी लेखकांची कमी कधीच नव्हती. आता हौसेच्या वरच्या पायरीवरचे, लेखनाकडे गंभीरपणे पहाणारे आणि आपल्या लेखनाला पैलू पाडण्याकडे लक्ष देणारे तरूण लेखक येत आहेत. ही नवीन लेखकांची फ़ौज मराठी भाषेला नवीन प्रकाशमान जगात स्थान मिळवून देतील. त्यांच्या साहित्याच्या प्रकाशाला उजाळा मिळो. वाचकांना आनंद मिळो. मराठीची भरभराट होवो. जगातील सर्वोत्कृष्ट साहित्यिक प्रसवणारी भाषा म्हणून मराठीची ओळख जगाला होवो.

या सर्वात ई साहित्याचाही खारीचा वाटा असेल हा आनंद.

या यशात ई लेखकांचा सिंहाचा वाटा असेल याचा अभिमान.

बस्स. अजून काय पाहिजे?